भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.५९२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०८/२०१७

**१) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन बासाचे दांडयाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०८/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील फिर्यादी गिरीधर गणपत पिंगरे वय ४२ वर्ष, रा. गांधी वार्ड बेला हा दिनांक २१/०८/२०१७ चे ११.०० वा. दर. पानटपरी वर बसला असता यातील आरोपीने शिवीगाळ करुन भांडण केले व फिर्यादी घटना ठिकाणी बकऱ्या चारीत असतांना आरोपीने मागेहुन जावुन बासाचे मोठया दांडयाने डोक्यावर व फिर्यादीचे मुलाच्या हातावर मारुन दोघांना जखमी करण्यास कारणीभुत केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थैरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :—**

दिनांक २१/०८/२०१७ चे १९.०० ते १९.३० वा. दर. यातील जखमी हा आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ६३६० ने खरबी रोडने जात असतांना विनोद बावनकर याचे घरासमोर यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन रॉग साईडने भरधाव वेगाने लापरवाहीने चालवुन जखमीचे मोटार सायकलला धडक देवुन अपघात करुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे एमएलसी रिपोर्ट व बयाना वरुन फिर्यादी उमेश दौलतराव भस्मे वय ४५ वर्ष, रा. खरबी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम २ आरआर, १८४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. ताराम पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २०/०८/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी कोणीही हजर नसतांनी घरुन निघुन गेली शोध घेतला असता मिळुन आली नाही तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेल्याचे संशय असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) नाल्याचे पाण्यात बुडुन मुलाचा मृत्यु . :—**

दिनांक २१/०८/२०१७ चे ०८.०० ते ०९.०० वा. दर. यातील मृतक संदीप गोमा खराबे वय २० वर्ष, रा. माटोरा हा आपले दोन मित्रासह बैल धुण्यास माटोरा येथील नाल्यावर गेला असता नाल्यात पाय घसरुन पाण्यात बुडयाल्याने त्यास फिर्यादीने मृत अवस्थेत सा. रु भंडारा येथे नेले असता डॉक्टरी मेमो व फिर्यादी बाजीराव जिबल खराबे वय ३५ वर्ष, रा. माटोरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २१/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७७ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत. संगणक कक्ष.** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.